# सविस्तर जाहिरात

## अधीक्षक अभियंता, छत्रपती संभाजीनगर पाटबंधारे मंडळ, छत्रपती संभाजीनगर
### कार्यकारी अभियंता, नांदूर मधमेश्वर कालवा विभाग क्र.2, वैजापूर, मुख्यालय छत्रपती संभाजीनगर

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2775/प्र.क्र.100/13 मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय मुंबई 400 032 दिनांक 17 डिसेंबर, 2016 अनुसार दिलेल्या निर्देशानुसार खालील संवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी यांची सेवा करार पध्दतीने या कार्यालयामधील विवक्षित कामासाठी नेमणूक करावयाची आहे.

| अ.क्र. | संवर्ग | पद संख्या |
|---|---|---|
| 2 | सहाय्यक अभियंता श्रेणी-2 / शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता | 01 |

जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांची नेमणूक कंत्राटी पध्दतीने एक वर्षासाठी करावयाची आहे. सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांना सिंचन व बांधकाम तसेच अनुषंगीक ( विवक्षित प्रकल्पाशी संबंधीत सर्वेक्षण, अन्वेषण, संकल्पन व प्रकल्प अहवाल तयार करणे, निविदा शर्ती, आर्थिक तरतूद, भुसंपादन, पुर्नवसन, इत्यादी ) प्रकाराचे ज्ञान व पुरेसा छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील जलसंपदा विभागातील सेवेचा अनुभव असणे आवश्यक आहे. इच्छुक अर्जदारांनी विहीत नमुन्यातील अर्ज कार्यकारी अभियंता, नांदूर मधमेश्वर कालवा विभाग क्र.2, वैजापूर, मुख्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे दिनांक 19.12.2024 पर्यंत प्राप्त होईल याप्रमाणे पोस्टाद्वारे किंवा प्रत्यक्ष सादर करावीत. अर्जाचे पाकीटावर " **सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करण्याबाबत** " असे स्पष्ट लिहून ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचे नाव लिहीण्यात यावे. नियोजित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. सदर नेमणूका मुलाखती घेऊन करण्यात येतील. सदर नेमणूकांचे आदेश हे योग्य स्तरावर अंतीम मान्यतेनंतर निर्गमीत करण्यांत येतील.

**सेवा करार पध्दतीवर भरावयाच्या पदांचा तपशिल खालील प्रमाणे**

| अ.क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचा तपशिल | जलसंपदा विभागातुन खालील पदावरुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी / कर्मचारी सदर पदाकरीता अर्ज करण्यास पात्र आहेत. |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | सहाय्यक अभियंता श्रेणी-2 / शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता | अधीक्षक अभियंता, छत्रपती संभाजीनगर पाटबंधारे मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांचे अंतर्गत जलसंपदा विभागातील सिंचन व बांधकाम प्रकारासाठी ( विवक्षित प्रकल्पाशी संबंधीत सर्वेक्षण, अन्वेषण, संकल्पन व प्रकल्प अहवाल तयार करणे, निविदा शर्ती, आर्थिक तरतूद, भुसंपादन, पुनर्वसन, इत्यादी ) व इतर विवक्षीत कामकाज करणे | सहाय्यक अभियंता श्रेणी-2 / शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता |

सदर नेमणूकीकरीता लागु असलेल्या अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना हा महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या ई-जलसेवा या वेबसाईट http://wrd.maharashtra.gov.in चे मुखपृष्ठावर उपलब्ध आहे. तसेच हा अर्ज व अटी / शर्ती कार्यकारी अभियंता, नांदूर मधमेश्वर कालवा विभाग क्र.2, वैजापूर, मुख्यालय छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात उपलब्ध आहे.

**सदर नेमणुका या खालील सर्वसाधारण शर्ती व अटीच्या अधिन राहतील :-**

1) अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी ज्या पदासाठी अर्ज केले आहे, त्या पदाचा विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.
2) सदर नेमणूक एक वर्षासाठीच राहील. सदर कंत्राटी सेवा एक वर्षापेक्षा जास्त वाढविण्याची आवश्यकता भासल्यास संबंधीतांचे कामकाज व आवश्यकता पाहून नियुक्ती अधिकारी तसा निर्णय घेऊ शकतात.
3) सेवा करार पध्दतीने नियुक्त सेवा निवृत्त अधिकारी यांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13 मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय मुंबई 400 032 दिनांक 17/12/2016 मधील अटी व शर्तीप्रमाणे शासन निर्णयासोबत असलेल्या परिशिष्ट-अ नुसार मासिक परिश्रमीक म्हणुन त्यांना अनुज्ञेय राहील.
4) करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही विभागात / संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचा इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार नसेल या बाबत अर्जदाराने रु 500/- च्या मुद्रांकावर प्रतिज्ञालेख देण्यात यावा.
5) करार पध्दतीवर नियुक्त करण्यात येणा-या (व्यक्ती) अधिकारी त्यांच्या वयाच्या 65 व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.
6) अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांची शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याबाबत जिल्हा शल्यचिकीत्सक अधिका-याचे मुळ प्रमाणपत्र द्यावे लागेल.
7) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमणूक दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र / हमीपत्र अटी व शर्ती संबंधीत उमेदवाराला मान्य आहेत या बाबत बंधपत्र उमेदवारास रु 500/- च्या मुद्रांकावर देणे बंधनकारक राहील.
8) अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी विरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण नसावे याबाबत अर्जदारांनी ज्या कार्यालयातुन सेवानिवृत्त झाले आहे, त्या संबंधीत कार्यालयाकडून तसे प्रमाणपत्र प्राप्त करुन सादर करणे बंधनकारक आहे.
9) नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील त्याबाबतची कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.
10) सदर अधिकारी / कर्मचारी त्यांच्यावर सोपविलेल्या पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही कामात गुंतलेला नसावा.
11) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.
12) अशा करार पध्दतीवरील अधिकारी / कर्मचारी यांना त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे / माहिती, कामाबाबत व आधारसामुग्री बाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.
13) नियुक्ती अधिकारी यांना त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता सेवा समाप्त करण्यात येईल.
14) अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांच्या सेवेच्या शेवटच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी संबंधीत कार्यालयाकडुन प्रमाणीत करुन तसे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच प्रशस्तीपत्र / नैपुण्यपुर्वक काम केले असल्यास ते प्रमाणपत्र अर्जासोबत जोडण्यात यावे.
15) क्षेत्रिय स्तरावर करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवाकाळामध्ये काही नैसर्गिक अपघात व काही आजार उद्धवल्यास हे कार्यालय वा शासन त्यावर उपचार करणेकरीता बांधील राहणार नाही.
16) अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांचे कुटूंब निवृत्तीवेतन मंजूरीचे महालेखापाल कार्यालयाचे दस्तऐवज सादर करणे आवश्यक आहे.
17) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमीत झालेल्या दिनांकापासुन 15 दिवसाचे आत रुजु होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

18) मुलाखातीकरीता पात्र उमेदवारांना पत्र ई-मेलव्दारे पाठविण्यात येईल व भ्रमणध्वनीव्दारे कळविण्यांत येईल. यास्तव अर्जदारांनी आपल्या वैयक्तीक माहितीत त्यांचा ई-मेल पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक देणे बंधनकारक आहे. तसेच मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी कार्यकारी अभियंता, नांदूर मधमेश्वर कालवा विभाग क्र.2, वैजापूर, मुख्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या सुचना फलकावर दिनांक 04.12.2024 रोजी प्रसिध्द करण्यांत येईल. व अंतिम निवड झालेल्या अर्जदारांची यादी वरील कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यांत येईल तसेच अंतीम निवड झालेल्या अर्जदारांना वैयक्तीक पत्राद्वारे / ई-मेलद्वारे कळविण्यात येईल.

19) सदर नियुक्ती क्षेत्रिय स्थळावर संबंधीत विवक्षित कामासाठी करण्यात येत असून त्यासाठी योग्य उमेदवार न भेटल्यास काही किंवा सर्व पदे रिक्त ठेवण्याचा अधिकार निन्मस्वाक्षरीकार यांना आहे.

20) करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणा-या अधिका-यांस / कर्मचा-यास प्रकारचे प्रशासकीय अधिकार व वित्तीय अधिकार राहणार नाहीत.

21) उपरोक्त अटी व शर्ती व्यतिरिक्त शासन / नियुक्ती अधिकारी वेळोवेळी ठरवतील त्या अटी व शर्ती अंतीम राहतील.

( कृष्णा ए. घुगे )
कार्यकारी अभियंता
नांदूर मधमेश्वर कालवा विभाग क्र.2,
वैजापूर, मुख्यालय-छत्रपती संभाजीनगर